रास्तभाव/शिधावाटप दुकानदारांच्या
मृत्यूनंतर त्यांच्या वारसांच्या नावे परवाना
देण्याबाबत कार्यपध्दतीत सुधारणा.

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्र. राभादु-२०२१/४४५/प्र.क्र.१३७/नापु-३१**
मंत्रालय (विस्तार), मुंबई- ४०० ०३२
दिनांक- ३० ऑगस्ट, २०२१.

वाचा :-

१. शासन निर्णय क्रमांक- अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, साविव्य-१०९१/२४२४/ प्र.क्र. ६१७८/ना.पु.२८, दि.१२.११.१९९१

२. शासन निर्णय क्रमांक- अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, साविव्य-१०९१/२४२४/ प्र.क्र.६१७८/ना.पु.२८,दि.२२.१२.१९९७

३. शासन निर्णय क्रमांक- अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, साविव्य- १०००/९३५/ प्र.क्र.७२/२०००/ना.पु.२८, दि.७.६.२०००

प्रस्तावना :-

अधिकृत शिधावाटप/रास्तभाव दुकानदाराचा मृत्यू झाल्यास त्यांच्या नांवे असलेला परवाना (प्राधिकारपत्र) रद्द होतो. मात्र वरील उल्लेखित क्रमांक १ येथील दि.१२.११.१९९१ च्या शासन निर्णयातील परिच्छेद १ मधील तरतुदीनुसार नवीन परवाना देताना वारसाला सर्वप्रथम अग्रक्रम देण्यात येतो. वरील उल्लेखित क्रमांक २ येथील दि.२२.१२.१९९७ च्या शासन निर्णयान्वये दुकानदाराच्या मृत्यूनंतर परवाना/प्राधिकारपत्र त्याच्या वारसाच्या नांवे देण्याची कार्यवाही त्वरेने व तीन महिन्यांच्या आत पूर्ण करावी, अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन परवानाधारकाच्या मृत्यूनंतर तीन महिन्यांच्या आत वारसदाराने अर्ज दाखल केल्यास संबंधित नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा/उप नियंत्रक मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र/संबंधित जिल्हाधिकारी/ जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्याकडून कार्यवाही करण्यात येते.

तथापि, वारसदाराने विलंबाने म्हणजेच तीन महिन्यांच्या नंतर संबंधित नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा/उप नियंत्रक मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र/संबंधित जिल्हाधिकारी/जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केल्यास, अशी प्रकरणे मान्यतेसाठी शासन स्तरावर प्राप्त होतात. या प्रकरणांमध्ये बहुतांशपणे मूळ परवानाधारकाच्या मृत्यूनंतर उद्भवणाऱ्या समस्या, कौटुंबिक व आर्थिक अडचणी, अज्ञान, प्रशासकिय कामकाजाची अनभिज्ञता यामुळे वारसदार विहित मुदतीत अर्ज सादर करु न शकल्याचे निदर्शनास आले आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता परवानाधारकाच्या मृत्यूनंतर संबंधित नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा/उप नियंत्रक मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र/संबंधित जिल्हाधिकारी/जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्याकडे वारसदाराने अर्ज करण्यासाठी असलेली तीन महिन्यांची मुदत पुरेशी व व्यवहार्य वाटत नसल्याने त्यामध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

परवानाधारकाच्या मृत्यूनंतर वारसदाराने १ वर्षाच्या आत परवाना वारसाने वर्ग करण्यासाठी अर्ज केल्यास त्यावरील कार्यवाही संबंधित नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा/उप नियंत्रक मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र/संबंधित जिल्हाधिकारी/जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी पुढील तीन महिन्यात

करावी. एक वर्षाच्या पुढील प्रकरणे शासन स्तरावर मान्यतेसाठी सादर करावीत. परवानाधारकाच्या मृत्यूनंतर संबंधित रास्तभाव दुकानाचा परवाना वारसाच्या नावे वर्ग करेपर्यंत सदर रास्तभाव दुकानाच्या क्षेत्रातील शिधापत्रिका नजीकच्या रास्तभाव दुकानास तात्पुरत्या स्वरुपात जोडण्यात याव्यात. परंतु वारसाच्या नावे परवाना वर्ग करण्याची कार्यवाही विहीत मुदतीत करावी. कोणत्याही कारणाने वारसास परवाना देता आला नाही, तर त्यानंतर मात्र नेहमीच्या पध्दतीने जाहिरनामा काढून प्राथम्य सुचीनुसार दुकान मंजूरीची कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०८३०१५३७२६७९०६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by GAJANAN RAMDAS DESHMUKH
Date: 2021.08.30 15:38:36 +05'30'

( गजानन रा. देशमुख )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा.राज्यपाल यांचे सचिव.
४. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५. मा. मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
६. मा. राज्यमंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
७. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव.
८. मा. सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहायक.
९. वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
१०. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातील सर्व सह सचिव, उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी.
११. सर्व जिल्हाधिकारी ( मुंबई शहर व उपनगर वगळून).
१२. नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
१३. सर्व उप आयुक्त (पुरवठा).
१४. सर्व उप नियंत्रक, मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्र.
१५. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी.
१६. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती).
१७. निवडनस्ती, कार्यासन नापु-३१.